wazirx

## ठळक मुद्दे आणि निरीक्षणे

# 2021 क्रिप्टोचे वर्ष



2021 या वर्षात जगभरात स्टॉक कसे विकत घ्यावेत याच्या तुलनेत बिटकॉइन कशी विकत घ्यावीत बिटकॉईन कशी विकत घ्यावीत यासाठी गूगलवर अधिक सर्च (शोध) करण्यात आले. या वर्षात एनएफटीबद्दल मथळेही झळकू लागले आणि अनेक देशांनी क्रिप्टो नियमने किंवा सीबीडीसींच्या दिशेने काम करण्यास सुरुवात केल्याच्या बातम्याही दिसू लागल्या.

जसजसे अधिकाधिक लोकांनी क्रिप्टोबद्दल वाचायला सुरुवात केली आणि या उदयोन्मुख पर्यायी मालमत्ता वर्गामध्ये गुंतवणूक करायला सुरुवात केली, तसतसे वझिरएक्सच्या युजर साइनअपमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून आमच्या युजरनी **1 कोटीचा आकडा ओलांडला.** वझिरएक्सचा 2021 मध्ये $4300 कोटी USD पेक्षा जास्त व्यापार झाला, जो 2020 च्या तुलनेत 1735% अधिक आहे!

**WazirX clocked a trading volume of over**

***$43 Billion USD in 2021***

**which is**

***1735% more than 2020!***

**Trading volume (in billion USD)**

as of 30th November 2021



आमचे युजर क्रिप्टोमध्ये रस घेण्यास का उद्युक्त झाले आणि त्याचा त्यांच्या जीवनावर काय परिणाम झाला हे जाणून घेण्यासाठी आम्ही आमच्या युजरमध्ये एक सर्वेक्षण केले. त्यांचे प्रतिसाद उत्साहवर्धक आहेत!

# सर्वेक्षणामधील मुख्य शोध आणि युजर विश्लेषण

30 / 11/ 2021

## *तोंडी प्रसिद्धी कधीही कालबाह्य होत नाही*

**51%**

of respondents entered crypto after hearing about it from their **friends and family**

**47%**

of respondents have entered the crypto space within the **last 6 months**

प्रतिसादकर्त्यांमधील 51% जणांनी मित्र आणि कुटुंबियांकडून ऐकल्यानंतर क्रिप्टोमध्ये प्रवेश केल्याचे मान्य केले. यानंतर सोशल मीडिया, आणि बातम्या व ब्लॉग यांचा क्रमांक राहिला. याशिवाय, सुमारे 47% प्रतिसादकर्त्यांनी गेल्या 6 महिन्यांमध्ये क्रिप्टो क्षेत्रात प्रवेश केला आहे. क्रिप्टो मुख्य प्रवाहात येत असताना, गुंतवणूकदारांना अधिक प्रशिक्षित करण्याची आणि भारतीय एक्सचेंजदरम्यान जबाबदार मार्केटिंगसाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

## *2021 मध्ये सर्वाधिक व्यापार झालेले क्रिप्टो*

भारतामध्ये प्रत्येकाला क्रिप्टोचा अॅक्सेस मिळवून देण्याच्या आमच्या प्रयत्नांमध्ये, वझिरएक्सने 2021 मध्ये आतापर्यंत 200+ मार्केट पेअर जोडल्या आहेत. मात्र, 2021 मध्ये एक्सचेंजवर सर्वाधिक व्यापार झालेले क्रिप्टो म्हणून बिटकॉईन (BTC) हे अव्वल स्थानी राहिले. इतर सर्वाधिक व्यापार झालेले क्रिप्टो होते टेथर (USDT), शिबा इनु (SHIB), डोजेकॉइन (DOGE), वझिरएक्स टोकन (WRX), आणि मॅटिक (MATIC), याच क्रमाने.



# वय आणि लिंग लोकसंख्याशास्त्रावर आधारित क्रिप्टो प्राधान्यक्रम

Growth in female signups 1009%

Growth in male signups 829%

2021 मध्ये, वझिरएक्सवर साइन अप करणाऱ्या स्त्रियांची संख्या 1009% नी वाढली, त्यांनी साइन अप करणाऱ्या पुरुषांच्या 829% वाढीला मागे टाकले. आम्हाला असेही आढळले की आमच्या प्लॅटफॉर्मवर क्रिप्टोमध्ये महिलांचा सहभागा वाढला आहे.

## *तरुणांना क्रिप्टो प्रिय आहे*

**66%** users below 35 years of age

वझिरएक्सचे 66% युजर 35 वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत. यावरुन असे दिसते की अधिकाधिक लोक त्यांच्या फिएट पोर्टफोलिओंचे चलनवाढीपासून संरक्षण करण्यासाठी हेज म्हणून क्रिप्टोवर विसंबून राहत आहेत.

## *पोर्टफोलियो वाटप*




51 years and above 11%

18 - 24 years 29%

आमच्या सर्वेक्षणाच्या 44% प्रतिसादकर्त्यांनी असे सांगितले की क्रिप्टोमधील त्यांची गुंतवणूक ही त्यांच्या एकूण गुंतवणूक पोर्टफोलिओच्या 10% पर्यंत आहे. '51 वर्षे आणि त्यापेक्षा अधिक' वयोगटातील केवळ 11% प्रतिसादकर्त्यांनी सांगितले की त्यांनी त्यांच्या एकूण पोर्टफोलिओच्या 50% पेक्षा जास्त वाटप क्रिप्टोमध्ये केले आहे तर हीच बाब '18-24 वर्षे' वयोगटासाठी 29% प्रतिसादकर्त्यांसाठी खरी आहे.

## 😎 *तुम्हाला माहित आहे*

महिलांमध्ये बिटकॉईन अधिक लोकप्रिय असताना, पुरुषांमध्ये ि शबा इनु क्रिप्टोमध्ये सर्वाधिक व्यापार केला!



# भारतीयांमध्ये क्रिप्टोचा प्रभाव

आपण कोव्हिड-19 च्या प्रभावामुळे हादरून गेलेलो असताना, 2021 मध्ये दुसऱ्या लाटेने आपल्याला आणखी जबरदस्त तडाखा दिला. या अनिश्चित काळामध्ये क्रिप्टोने केवळ सामान्य लोकांना ऑनलाईन कमाई करण्याचे नवीन मार्गच दाखवले नाहीत, तर आपल्या देशाला मदत करण्यासाठी पुढे जात भारतीय क्रिप्टो समुदायासह महामारीशी लढा दिला.

शहरांच्या वर आणि पलिकडे जाऊन आम्हाला गुवाहाटी, कर्नाल, बरेली आणि त्यासारख्या इतर लहान शहरांमधून साइनअपच्या संख्येमध्ये 700% वाढ पाहायला मिळाली, ज्यामधून निम-शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये क्रिप्टोचा वाढता स्वीकार दिसतो.

त्याशिवाय, आमच्या सर्वेक्षणाच्या 61% प्रतिसादकर्त्यांनी सांगितले की त्यांना क्रिप्टोची मदत झाली आहे – त्यापैकी – 78% जणांना असे वाटले की क्रिप्टोने त्यांना आर्थिक मदत केली आहे.

**61%**

**of respondents shared that crypto has helped them**

of whom

**78%**

**felt that crypto has helped them financially**

💰 ***तुम्हाला माहित आहे का: 30 नोव्हेंबर 2021 पर्यंत, वझिरएक्सच्या 82% युजरना त्यांच्या क्रिप्टो गुंतवणुकींमध्ये नफा झाला आहे, म्हणजे त्यांच्या क्रिप्टो पोर्टफोलियोमध्ये वाढ दिसली आहे.***

क्रिप्टोचा सामान्य लोकांवरील परिणाम - प्रचंड असला तरी - व्यापारापलिकडे जाऊन कारकिर्दीच्या संधींचा समावेश करते आणि त्याशिवाय बरेच काही.

त्याबरोबरच, सर्वेक्षण प्रतिसादकांपैकी 51% नी सांगितले की त्यांना क्रिप्टो क्षेत्रात काम करण्याची इच्छा आहे. सर्वाधिक आकर्षक भाग? उद्यमशीलता, फायनान्स आणि बिझनेस डेव्हलपमेंट या सर्वात आघाडीचे तीन कारकीर्द निवडी होत्या!

**51%**

**of respondents shared that they would want to work in crypto**

*Top 3 career choices:*

- 🏬 **Entrepreneurship**
- 💰 **Finance**
- 💼 **Business Development**

वझिरएक्स एनएफटी मार्केटप्लेसच्या मदतीने 962 क्रिएटरने 12,600 एनएफटी मिंट केल्या असून आतापर्यंत त्यापैकी 5267 एनएफटी 262,896 डब्ल्युआरएक्स मूल्याहून अधिक (भारतीय रुपयांमध्ये ~₹2.4 कोटी) किंमतीला विकल्या आहेत

### 🖼️ *Empowering NFT creators*

| 962 | 12,600 | 5,267 | 262,896 WRX |
|---|---|---|---|
| Creators | NFTs minted | NFTs sold | Worth NFTs sold (~₹2.4 crores) |

## 2022 साठी भाकिते

2021 मधून आकर्षक इनसाइटच्या आधारे, 2022 मधील क्रिप्टोसाठी येथे काही भाकिते दिली आहेत:

### क्रिप्टोमध्ये बीटीसीपेक्षा काहीतरी अधिक आहे याची संस्थांना जाणीव होणे

2017 पासून बिटकॉईनचे वर्चस्व सातत्याने कमी होत असताना, 2021 मध्ये त्याच्या वर्चस्वामध्ये ~70% पासून 40% पर्यंत तीव्र घसरण झाली. जरी बीटीसी हे 2020 तसेच 2021 मध्ये वझिरएक्सवर सर्वाधिक व्यापार झालेले क्रिप्टो होते तरीही, आमच्या एकूण व्यापार आकारमानात त्याचे योगदान घसरले आहे. असे दिसते की क्रिप्टोमध्ये बिटकॉईनपेक्षाही आणखी बरेच काही आहे याची जास्तीत जास्त लोकांना आणि संस्थांना जाणीव होत आहे. यामुळे इथेरियम, सोलाना, कार्डानो आणि अगदी 2 स्तरीय सोल्यूशनसारख्या लोकप्रिय अल्टकॉईनच्या अनुप्रयोगांमधील कल्पकतेला वाव मिळेल.

### नियामक स्पष्टता

भारतापासून अमेरिकेपर्यंत आपण सर्व महत्त्वाच्या देशांना क्रिप्टोच्या नियमनांवर सक्रियपणे चर्चांचा पाठपुरावा करताना पाहिले. भारतामध्ये आपण आपल्या अर्थमंत्र्यांना क्रिप्टो नियमानांप्रति तोलूनमापून दृष्टीकोन घेण्याविषयी बोलताना पाहिले, संसदेच्या स्थायी समितीने सार्वजनिक सूचना मागवल्या, भारतामधील क्रिप्टो नियमनाचे आवाहन करण्यासाठी आपल्या पंतप्रधानांनी स्वतः पुढाकार घेतला आणि त्यानंतर आपल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात क्रिप्टो नियमन विधेयक विषयसूचीमध्ये नोंदवण्यात आले. क्रिप्टो नियमनाची प्रक्रिया सुरु झाली आहे आणि आपल्याला नियमनाविषयी लवकरच स्पष्टता मिळेल.

### वाढता संस्थात्मक सहभाग

2021 मध्ये संस्थांचा क्रिप्टोंमधील दृढ सहभाग पाहायला मिळाला. वित्तीय संस्थांच्या वर आणि पलिकडे, आपल्याला पेपल, टेस्ला, मास्टरकार्डसारख्या तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या आणि इतर कंपन्याही क्रिप्टोमध्ये सहभाग घेताना दिसल्या, ज्यामुळे किरकोळ सहभाग शक्य झाला. याच्या जोडीला नियमाक स्पष्टतेमुळे गुंतवणूकदारांना - सध्याच्या आणि नव्या - क्रिप्टो गुंतवणुकीबद्दल ि शस्तबद्ध, ठराविक अंतराने नियमित रक्कम गुंतवणूक करण्याच्या दृष्टीकोनाला प्रोत्साहन मिळेल आणि त्यांना मागे पडण्याची भीती राहणार नाही. आमची अशीही अपेक्षा आहे की भारतीय संस्थात्मक गुंतवणूकदारांनी अमेरिकेतील संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून काही शिकावे आणि त्यांचे अनुकरण करावे.

## वेब 3.0 मेटाव्हर्स

प्रमुख वेब 2.0 कंपन्यांनी मेटाव्हर्सचा प्रयोग करायला सुरुवात केली आहे आणि फेसबुकने आपला ब्रँड बदलून मेटा करणे किंवा मायक्रोसॉफ्टने 3डी मेटाव्हर्स अॅपची योजना आखणे ही केवळ सुरुवात आहे. येत्या वर्षात हे मुख्य प्रवाहात येत असताना आपल्याला डेफाय, एनएफटी, गेमफाय सारख्या अॅप्लिकेशनची आवक दिसणार आहे, जिथे युजरना त्यांच्या स्वतःच्या डेटाची मालकी मिळेल आणि व्हर्च्युअल अर्थव्यवस्थेतून त्यांना कमाई करता येईल.

## क्रिप्टोमधील रोजगार

लिंक्डइनच्या इकॉनॉमिक ग्राफ टीमकडून मिळालेल्या डेटानुसार, ऑगस्ट 2021 मध्ये अमेरिकेत क्रिप्टो किंवा ब्लॉकचेनच्या जॉब पोस्टिंगमध्ये 615% वाढ झाली आहे. एकट्या भारतामध्ये, आज क्रिप्टो उद्योगात - प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे - सुमारे 50,000 लोकांना रोजगार मिळाला आहे. नासककॉमच्या अहवालानुसार, भारतातील क्रिप्टो बाजारपेठ दुप्पट वेगाने वाढेल आणि त्यामध्ये 2030 पर्यंत 800,000 पेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण करण्याची क्षमता आहे. सकारात्मक नियमन भारतीयांना केवळ नवनिर्मिती आणि उभारणीच्याच दिशेला ढकलणार नाही तर रोजगार निर्मितीसाठीही प्रोत्साहन देईल, ज्यामुळे आपल्याला आत्मनिर्भर भारत (स्वयंपूर्ण भारत) होण्यात मदत होईल.

***